**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
सुविड फाउंडेशन, रिसोड
वाशिम

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 05-05-2026**

**वॉशिम(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2026-05-05 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2026-05-06 | 2026-05-07 | 2026-05-08 | 2026-05-09 | 2026-05-10 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 42.9 | 43.2 | 43.9 | 44.1 | 44.3 |
| किमान तापमान (अं.से) | 23.7 | 24.0 | 24.6 | 25.0 | 25.3 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 69 | 67 | 70 | 72 | 71 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 58 | 57 | 56 | 60 | 59 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 8 | 10 | 9 | 9 | 10 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 320 | 287 | 275 | 250 | 287 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 2 | 2 | 1 | 2 |
| चेतावणी | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही |

## भविष्यवाणी सारांश:

• वाशीम जिल्ह्यात भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार पुढील ५ पुढील आकाश निरभ्र राहून हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •पुढील ५ दिवसा दरम्यान कमाल तापमान ४२.९ ते ४४.३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २३.७ ते २५.३ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •पुढील ४८ तासात कमाल तापमानात कोणताही विशेष बदल होणार नाही, त्यानंतर पुढील काही दिवस संपूर्ण विदर्भात २ ते ३ अंश सेल्सियस ने तापमानात वाढ होईल.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

कोणताही ईशारा नाही

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

काही नाही

## कृषि सल्ला:

प्रक्रिया केलेले बियाणे साठवणूक करतांना गोडाऊन मध्ये हवा खेळती असेल अशा ठिकाणी साठवणूक करा. बियाने साठवणूक थप्पी ६ फुटाच्या वर नसावी. सध्याच्या वाढत्या तापमानापासून संरक्षण करण्यासाठी उन्हाळी पिके , भाजीपाला व फळबागांना सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळी ओलीत करावे. पिकांच्या वाढीच्या संवेदनशील अवस्थांमध्ये वारंवार ओलीत करावे.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

जमिनीमध्ये ओलावा पाहून आवश्यकता असल्यास पिकाला पाणी द्यावे. तसेच ओलीत करताना प्राधान्याने ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा आवलंब करावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तीळ | •जमिनीच्या मगदुरा प्रमाणे तीळ पिकाला ओलीत करावे तसेच ओलीत करतांना पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. •उन्हाळी तीळ पिकास सकाळी किंवा सायंकाळी ओलीत करावे. उन्हाळी तीळ पिकास गरजेनुसार ओलीत करावे. तीळ पिकातील फिलोडीच्या नियंत्रणासाठी संक्रमित झाडे काढून टाकावी आणी नष्ट करावी.तुडतुडे व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामान लक्षात घेऊन क्वीनॉलफॉस२५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मुग | •उन्हाळी मुग शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे अश्या वेळी पिकास ताण बसू नये यासाठी गरजेनुसार ओलीत करावे. उन्हाळी मुग पिकात कोरडे हवामानामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी पिकास सकाळी किंवा सायंकाळी ओलीत करावे. |
| भुईमूग | • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, उन्हाळी भुईमूग पिकावरील तांबेरा व टिक्का या रोगाचे व्यवस्थापन करण्यास टेबुकोनोझोल २५ टक्के डब्लू.जी ५००-७५० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. •भुईमुग पिकात शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. • शक्य असल्यास ओलीत करण्याकरिता तुषार सिंचन पद्धतीचावापर करावा. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हळद | •कोरडे हवामान लक्षात घेता हळद पिकाची उकळणे ,वाळवणे पॉलिश करणे ही कामे करून घ्यावी. |
| संत्रा | • आंबिया बहरातील फळधारणा टिकवून ठेवण्यासाठी ओलीत चालू ठेवावे. उन्हाळा आणि उच्च तापमानामुळे सिंचनाची वारंवारता ६-७ दिवसांच्या अंतराने ठेवावी. • उन्हाळ्याच्या महिन्यांत झाडाच्या बुंध्याभोवती ५-१० सेंटीमीटरपर्यंत गव्हाचे पेंढा किंवा उपटलेल्या तणांनी आच्छादन करावे जेणेकरून उच्च तापमानामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी करता येईल ज्यामुळे बाष्पीभवन पीक कमी होण्यास मदत होईल. • एक वर्षाच्या झाडासाठी १०८ ग्रॅम युरिया किंवा २५० ग्रॅम अमोनियम सल्फेट आणि १५७ ग्रॅम सिंगल सुपरफॉस्फेट तसेच २५ ग्रॅम झिंक सल्फेट, २५ ग्रॅम फेरस सल्फेट आणि २५ ग्रॅम मँगनीज सल्फेट या प्रमाणात खत द्यावे. २, ३ आणि ४ वर्षांच्या झाडांसाठी हे प्रमाण एका वर्षाच्या झाडासाठी शिफारस केलेल्या प्रमाणाच्या दुप्पट, तीन आणि चार पट असावे. जमिनीत प्रत्येक झाडाला २० ते २५ किलो शेणखत द्यावे. ही खते आणि शेणखत झाडांच्या परिघामध्ये टाकावे आणि काळजी घ्यावी की खते फक्त ओलसर जमिनीतच टाकावीत. • या महिन्यात कोळी किडीचा प्रादुर्भाव धोकादायक बनतो. या किडीचा नियंत्रण करण्यासाठी, डायकोफोल १.८ ईसी @ २ मिली किंवा प्रोपारगाईट १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करता येते. १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी करा. • लिंबूवर्गीय पिठ्या ढेकुण किडीच्या नियंत्रणासाठी, मुंग्यांची घरटी नष्ट करावी आणि क्लोरपायरीफॉस २० ईसी @ २ मिली / लिटर पाण्यात किंवा डायक्लोरोव्होस @ २.५ मिली / लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या पानांवर आणि खोडावर फवारणी करा. • लिंबूवर्गीय झाडांवरील मृत फांद्या छाटून घ्याव्या, मृत भागाच्या सुमारे २ सेमी खाली ठेवावे आणि त्यानंतर कार्बेंडाझिम बुरशीनाशक प्रति लिटर पाण्यात एक ग्रॅम या प्रमाणे फवारणी करावी. • आंबिया बहारातील फळ गळ टाळण्यासाठी, १०० लिटर पाण्यात १.५ ग्रॅम २ ४ - डी किंवा जिबरेलिक अॅसिड १०० ग्रॅम बेनोमील आणि १ किलो युरिया मिसळून १०० लिटर पाण्यात विरघळवून फवारणी करावी. जर जास्त फळ गळती होत राहिली तर १५ दिवसाच्या अंतराने पुन्हा फवारणी करावी. • मध्यम प्रकारच्या जमिनीतील मंत्रा बागेस मृग बहार घेण्याकरिता २५ एप्रिल पासून १५ जून पर्यंत ५० दिवसांचा पाण्याचा ताण द्यावा. |
| टोमॅटो | •भाजीपाला पिकास गरजेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. • टोमॅटो पिकामध्ये फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्याव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • मागील आठवड्यातील अंशतः ढगाळ वातावरणामुळे टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून असल्यास व्यवस्थापनासाठी मॅनकोझेबझे ७५ डब्लूपी लू . २५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी लू . २५ ग्राम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • टोमॅटो पिकामध्ये फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्याव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | •भाजीपाला पिकास गरजेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. •मिरची पिकावर चुरडा मुरडा रोगाचा प्रादुभाव फुलिकडे, पांढरी माशी आणि कोळी किटकामुळे पसरण्याची शक्यता असते. किडे पानातील रस शोषून घेतात. त्यामुळे पाने सुरकुततात व पानांची वाढ खुंटते. किडीचा प्राद्रुभव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० % प्रवाही १० मि.ली. + गंधक २ ग्राम प्रती लीटर पाण्यात मिसळून १० ते |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. तसेच पिका मध्ये पिवळ्या रंगाचे चिकट कागदी सापळे वापरावेत. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. पशुधनाकडून (उदा. बैल) सकाळी११ ते दुपारी ०४ वाजतादरम्यान काम करणे टाळावे.गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेडला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचासमावेश करावा. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | •कोंबड्याच्या शेडमध्ये हवा खेळती राहण्यासाठी व्हेंटीलेटर्स( रुंद खिडक्या) ची व्यवस्था करावी तसेच उन्हाळ्यातील उष्णतेपासून त्यांना इजा होऊ नये म्हणून शेड / छतावर गवत पसरवावे. अधूनमधून या गवतावर पाणी शिंपडावे त्यामुळे शेडच्याआतील तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल. • उष्णतेपासून त्रास होऊ नये म्हणून उन्हाळ्यात कोंबड्याना खाद्य सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेत द्यावे.•वारा वाहत असलेल्या दिशेने शेडच्या बाजूस पाण्याने भिजलेला बारदान किंवा गोणपाट बांधावा. तसेच पोल्ट्रीमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | फळझाडामध्ये बाष्पीभवन कमी करण्यासाठी व झाडातील ओलावा टिकवण्यासाठी केओलीन ५ टक्के ची फवारणी करावी • वाढत्या उष्ण तापमानात बाष्पीभवनचा वेग जास्त राहतो त्याकरिता नवीन लागवड केलेल्या (१ ते ३ वर्ष ) वयाच्या फळ झाडांना (पर्हाटि, तुराटी किंवा ग्रीननेट कापड) ने छोटे मंडप तयार करून सावली करावी व तसेच झाडांना सकाळी किंवा संध्याकाळी ओलीत करावे. |

## हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

| |
|---|
| काही नाही |

## परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

| |
|---|
| काही नाही |

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**